" होय. "

" पहा बुवा येथेंही थांबतां येत नाहीं. याच्याही पलीकडे गेलें पाहिजे. तें बीं उत्पन्न होण्यापूर्वी काय गोष्टी घडल्या ? "

" तें फुलांतून पैदा झालें. '

" तें कसें ?" तेव्हां तो विद्वान् गृहस्थ मित्राला म्हणाला, "त्या फुलांत पूं-केसर व स्त्री--केसर धारण करणारे असे दोन प्रकारचे अवयव होते. त्या पूं-केसरांतील अतिसूक्ष्म, डोळ्यांना न दिसणारे असे पराग, वाऱ्यानें उडून अथवा मधमाशा वगैरेंच्या पायांना लागून त्या स्त्री--केसररूपि अवयवांना चिकटल्याबरोबर त्या पूं--केसररूपि परिमाणूला स्फूर्ति होऊन तो त्या फुलाच्या आंत एक तंतु मुळाप्रमाणें सोडीत असतो. हा तंतु त्या फुलाच्या देठांत पोहोंचल्यावर तेथें बीं निर्माण होऊन त्या फुलाची कामगिरी संपून तें फुल सुकतें व गळून पडतें. "

मित्र म्हणाला, " हें तुम्ही कशावरून सांगतां ? "

" सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यावर हें सहज कळतें. "

" पण साधारण माणसाला हें कसें कळावें ? त्याला त्या फुलांत ही घडत असलेली कृति त्याच्या डोळ्यांनीं सूक्ष्मदर्शक यंत्राच्या अभावीं दिसण्यासारखी आहे काय ? "

" नाहीं. "

" मग तो जर म्हणाला हें तुम्ही कांहीं तरी सांगतां तर तुम्ही त्याला काय म्हणाल ? "

" या गोष्टीविषयीं त्याच्यांत पूर्ण अज्ञान आहे. "

" असो ! प्राणिशास्त्रांत अशीच परिस्थिति आहे ना ? "

" होय. "

" पाण्यांतील मासे वगैरे खालच्या दर्जाच्या प्राण्यांत आपणापासून एकाच वेळीं असंख्य प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे ना ? "

" होय. "

" जसजसा अकलेच्या प्रमाणें वरवरच्या स्थितींतला प्राणी आढळतो नसतसें त्याचें आपणांसारखींच प्रतिबिंबें एकाच वेळीं उत्पन्न करण्याचें सामर्थ्य कमी कमी दिसत येऊन, सरते शेवटीं सस्तन माकडें व मनुष्यें या उच्च कोटींतल्या प्राण्यांत एकाच वेळीं एकच, अगदीं अगदीं विरळा, दोन अथवा तीन, इतकेच प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य दिसून येतें ? "

" होय. "

" आतां आपण पुन्हां पालुपदावर येऊं. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून सस्तन प्राण्याचें रेत तपासतां केवळ सुईच्या अग्रावर राहील इतक्या सूक्ष्म बिंदूंत लक्षावधि जिवंत परिमाणु इतस्ततः वेगानें परिभ्रमण करतांना दिसतात ना ?

" होय. "

"त्यांतला एकच परिमाणु स्त्रीच्या शरीरांतर्गत ठराविक वेळीं उत्पन्न होणाऱ्या एकच अत्यंत सूक्ष्म अशा अंडज परिमाणूला स्पर्श करून परिमाणूंत त्याच प्रमाणें प्राणी उत्पन्न करण्याची चेतना देऊन नंतर त्या प्राण्याची वाढ त्या स्त्रीच्या शरीरांत ठराविक मुदतीपर्यंत होऊन पूर्ण शरीरयुक्त प्राणी जन्माला येतो हें खरें ना ? "

" होय. "

"सस्तन उच्च कोटींतल्या प्राण्यांच्या मादीच्या शरीरांत ठराविक वेळीं जें सूक्ष्म अंड उत्पन्न होतें त्याला क्वचित प्रसंगींच जर वरील वर्णन केलेल्या जीवंत सूक्ष्म पण चलनयुक्त अशा परिमाणूंचा स्पर्श झाला तरच त्या अंड परिमाणूला गर्भधारणा करण्याची स्फूर्ति होते. तसें न झाल्यास त्याचा नाश होतो. याप्रमाणें त्या रेताच्या बिंदूंतल्या कोट्यावधि जीवंत परिमाणूंपैकीं एकच परिमाणू देहधारणासाठीं भाग्यवान होऊन बाकीच्यांची देहधारणेची वासना व धडपड निष्फळ होऊन त्यांचा नाश होत असतो ! "

"होय."

" यावरून पहातां या आपल्या उच्च कोटींतल्या प्राण्यांच्या शरीरांत

ते उत्पन्न करण्याचें अतर्क्य सामर्थ्य आपणामध्यें आहे, हें आतां तुम्हांला कबूल करावें लागतें ना ?"

"होय."

"हे जीवंत सूक्ष्म परिमाणू सूक्ष्मदर्शक यंत्राच्या अभावी साधारण मनुष्याच्या स्थूल दृष्टीला न दिसल्याभुळें ते अस्तित्वांत नाहींत असें त्यानें म्हटल्यास तुम्हांला त्याच्या अज्ञानाची कींव वाटेल !"

"होय."

"याच प्रमाणानें योग्य अनुभवाच्या अथवा तशाच योगसाधनांच्या अभावीं स्थूल देहविमुक्त वासनात्मक देह आहेत जे प्रचलित यंत्रद्वारें दिसणें असंभवनीय आहे असें श्री साईबाबांसारख्या दिव्य देहधारिन् पूर्ण अनुभवी अशा सत्पुरुषांनीं प्रतिपादन केल्यास तसें नाहीं असें बोलण्याचा आपणांस अधिकार प्राप्त होतो ! "

"परंतु हें समजावें कसें ?"

"ज्याप्रमाणें वरील प्रकारांत सूक्ष्मदर्शक यंत्राची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें ह वासनात्मक सूक्ष्म लिंगदेह साक्षात् अनुभविण्यास योग-मार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. आकाश तत्त्वाचें आकलन होईपर्यंत अभ्यास झाला पाहिजे. आम्हांला आमच्या चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं-सबब नाहीं, हें बोलणें गैर आहे असें आतां कबूल केलें पाहिजे ना ?"

"होय."

याप्रमाणें माझ्या स्नेह्याच्या आणि त्याच्या विद्वान् मित्राच्या दरम्यान जो संवाद झाला तो जशाचा तसा वर देण्यांत आला आहे.

या संवादापासून काय बोध घेतां येतो !

१ वर वर्णन केलेल्या अनंतकोटि जीवंत देहधारिनोत्सुक परिमाणु उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आपल्या शरीरांत आहे. रोजच्या परिचयाची ही गोष्ट असल्यामुळें या सामर्थ्याच्या थोरवीबद्दल व्हावा तितका विचार होत नाहीं.

२ या सामर्थ्याचा विनाकारण व्यय व नाश न व्हावा यासाठींच ब्रह्मचर्याची उपयुक्तता आहे

३ केवळ प्रजोत्पत्तीच्याच हेतूनें ऋतुकाळीं स्वस्त्रीला स्पर्श करण्याची जी शास्त्राज्ञा आहे तिचा हेतूच हा कीं, या सामर्थ्याचा विनाकारण विनाश न व्हावा, व तसें आचरण ठेविल्यास गृहस्थाश्रम्याला व त्याच्या सुगृहिणीला पूर्ण ब्रह्मचर्याची योग्यता व त्यामुळें स्वाभाविक रीतीनें उत्पन्न होणारें सामर्थ्य प्राप्त होत असतें.

४ याप्रमाणें आपल्या अंतर्गत असलेल्या सामर्थ्याचा जपून विनियोग व विकास केल्यास त्याचा परिणाम शरीरावर व मनावर होऊन तो देह सतेज व ओजसयुक्त होतो.

५ प्रथमतः शरीर निरोगी होतें, आत्मसामर्थ्य वाढतें आणि हातीं घेतलेलीं कार्यें सहज सिद्धीस जातात.

६ उर्ध्वरेता होणें ही त्याची पुढली पायरी. उर्ध्वरेत्याचें महात्म्य पुराणांत व शास्त्रांत गायिलेलें आहे, तें प्रत्यक्ष अनुभवावरून आहे. अशांची संतति त्यांच्याचप्रमाणें अत्यंत दीर्घायु, सुसंस्कृत आणि सामर्थ्यवान् अशी निपजते.

७ स्वस्त्रीला केवळ हक्काच्या वारांगनेप्रमाणें वागविणें यांत उभयतांचा व स्वकुलाचा ऱ्हास व नाश ठरलेलाच.

८ याच कारणामुळें स्वच्छंदवृत्तियुक्त राहून गर्भधारणा न होण्यासाठीं पाश्चात्यांचीं कृत्रिम साधनें, हीं सर्वथैव त्याज्य.

९ वसतिगृहांत राहाणाऱ्या तरुण मुलांमुलींमध्यें वाईट संगतीनें अथवा तशाच प्रकारच्या वाङ्मयामुळें ज्या दुष्ट गुप्त संवयी जडत आहेत, त्याकडे जनतेचें जावें तसें लक्ष जात नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे.

१० या संवयीमुळें त्या मुलांमुलींची वाढ दुबळी व उत्तरोत्तर क्षीण होऊन त्यांचीं शरीरें कायमचीं रोगग्रस्त होत्सातीं तीं मुलें अकालीं मृत्युवश होतात.

११ पोटापाण्याच्या उद्योगासाठीं पाश्चात्य शिक्षणामध्यें निमग्न होऊन (जें शिक्षण परकीय सरकारनें स्वतःचें राज्य चालविण्यासाठीं फक्त स्वस्त पगाराचे कारकून निर्माण करण्याच्याच हेतूनें अस्तित्वांत आणलें आहे.) ऐन तारुण्याचा जोम या अभ्यासापायीं नष्ट होऊन लग्न होणें लांबणीवर पडतें चाललें आहे.

१२ म्हणून सर्व बाजूंनीं, सर्व तऱ्हांनीं पाश्चात्यांचेंच अंध दृष्टीनें अनुकरण न करतां आपणांपाशीं स्वयंसिद्ध स्वोद्धाराचीं काय उत्तम बिनपैशाचीं साधनें आहेत याची जाणीव उत्पन्न करवून तरुण व गृहस्थाश्रमी मंडळीपुढें स्वतःचें मानसिक व शारीरिक सामर्थ्य कसें सुलभ व साहजिक रीतीनें वाढवितां येईल यासाठीं प्रत्येकानें झटलें तरच त्याच्या अंतर्गत असलेल्या **जीवंत हिंदुत्वाचा** खरा उपयोग होईल.

१३ पाश्चात्यांचीं प्रचलित दिखाऊ शरीरें किती भयंकर प्रमाणांत वाळवीनें पोखरलेल्या घराप्रमाणें रोगग्रस्त आहेत हें जर्मन युद्धाच्या वेळीं डॉक्टरांनीं प्रतिपादन केलेलें आहे.

आपल्या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या प्रख्यात् कर्नर कार्टर या प्रिन्सिपालच्या हाताखालीं अध्ययन केलेल्या डॉक्टरांना कार्टरसाहेब पाश्चात्यांचें National Drink ( सार्वजनिक पेय ) काय आहे हें हमेशा सांगत असल्याचें आठवत असेलच.

१४ जपानी लोकांचीं शरीरें पाश्चात्यांच्या शरीरांच्या ठेवणीपुढें तुलना केल्यास किती कमताकद दिसतात, पण तसें आहे काय ? गेल्या ३०--४० वर्षांत त्यांनीं कशी अघाडी मारली आहे याचा बारकाईनें विचार व्हावा.

१५ शेंकडों वर्षांपूर्वीं आपल्या या मायभूमीमध्यें वाममार्गाचा उपयोग करून पाहाण्यांत आला, आणि तो कुचकामी ठरल्यामुळें ऋषिमुनींनीं दूरवर नजर ठेवून त्याला फांटा दिला. सबब पाश्चात्यांचे प्रचलित वाममार्ग आपल्या कामाचे नाहींत; कारण त्यामुळें अधोगति ही ठरलेली.

१६ संतांच्या स्वानुभवयुक्त शिकवणीवर भार देऊन ऋषिकुळांतून ब्रह्मचर्येच्या उपयुक्ततेमुळें तयार झालेली जनता कशी तेजस्वी होती याचा उत्तम दाखला शिकंदर बादशाहाबरोबर असलेला हिरोडोटस म्हणून इतिहासज्ञ होता त्याचें वाक्य साक्ष देतें. तो म्हणतो कीं, No man was found telling a lie, and no woman unchaste. "एकही पुरुष असत्यवादी आणि एकही स्त्री व्यभिचारिणी नव्हती." ही शत्रुपक्षाकडील उक्ति आहे हें

सत्यान्वेषि सात्विक जनतेपुढें शिकंदराला व त्याच्या असुरी सैन्याला हात टेकावे लागले.

ही झाली त्या वेळेची गोष्ट; परंतु सत्यान्वेषीपणामुळें गृहस्थाश्रमी असूनही सशास्त्र ब्रह्मचर्याची महति प्रत्यक्ष कृतींत उतरवून दाखवून काय सामर्थ्य येतें याचें मूर्तिमंत स्वरूप महात्मा गांधी हे आपल्या दृष्टीपुढें आहेत.

पाश्चात्य संस्कृतीचा छाप त्यांच्यावर--त्यांच्या पूर्वाश्रमीच्या वर्तनावर पडला होता. तथापि त्यांचें पुढील वर्तन पाहा.

या एकाच व्यक्तीला सर्व जग हालवून सोडण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे. त्यांची शरीरयष्टि ती काय ? त्यांना रंगरूप कांहीं तरी आहे काय ? " नास्ति तेषु जाति विद्यारूप कुल धन क्रियादि भेदा. " या नारदुक्तीचें चालतें बोलतें स्वरूप ते आहेत कीं नाहींत ? आपणां सर्वांना ते अत्यंत आदरणीय व वंद्य वाटतात तें कां ? तर संतांच्या शिकवणीचें रहस्य जाणून त्याप्रमाणें आचरण ठेवून गृहस्थाश्रमी असूनही, ब्रह्मचर्याचें जें त्यांनीं शास्त्रोक्त पालन केलें त्यामुळेंच त्यांच्यांत हें अतर्क्य व अतुलनीय सामर्थ्य आलें आहे.

१७ चर्मचक्षूंनीं दिसणारे व न दिसणारे अशा वासनात्मक सूक्ष्म देहांनीं हें सर्व व्योम भरलेलें आहे. अणुरेणूमध्यें प्रत्येक रजःकणांत त्यांचा प्रतिक्षणीं बुजबुजाट आहेच. त्यांतला प्रत्येक लिंग, देह स्थूल-देह धारणेसाठीं सारखी धडपड करीत आहे. **किता अनंत कोटि** मानवदेहधारणोत्सुक अत्यंत सूक्ष्म पण जीवंत अशा परिमाणूंचा नाश होऊन त्यांतला एकच स्थूलदेह प्राप्त करून घेण्याला नशीबवान् होतो हें वर वर्णन केलेल्या सप्रमाण विवेचनावरून सिद्ध होतें आणि त्याच्या सत्यतेविषयीं **सर्व डॉक्टरांना** लेखक अत्यंत नम्रपणानें खुलें आवाहन करीत आहे.

याप्रमाणें परिस्थिति असल्यानें संतांनीं वर्णन केलेलीं व गाईलेलीं वाक्यें—**मानव देहधारण्यासाठीं चौऱ्यांयशी लक्ष योनींतून फिरावें लागतें**, खरीं ठरतात. किंबहुना त्यांनीं आपली बाजू फारच उदार प्रमाणांत ठेविलेली आहे. वस्तस्थिति यापेक्षां कितीतरी बिकट आहे याचा

असें जर उघड उघड आहे तर या अप्रतिम नरतनूचा कोणत्या तऱ्हेनें खरा उपयोग होईल ? "अरे आ ुन कोण याचा रातदिस विचार करावा " या साईपदांजवळ ऐकलेल्या वाक्याचा सतत विचार करून जर संतांच्या वाक्यापासून अनुभव न घेतला तर श्रींच्याच शब्दांप्रमाणें "आलं वारं गेलं वारं " असें होऊन पुन्हां आपली मनुष्यदेह धारण करण्याची **काय-मची भयंकर धडपड** ठेवलेलीच. ही गोष्ट आपणां हिंदवासियांस कधींही इष्ट नाहीं.

पाश्चात्यांस व केवळ माथेफिरू अशा परधर्मीयांस आपल्या या पवित्र हिंदमातेच्या पुत्रांत अनेक धर्म, चाली, रीति, परस्परांपासून विसंगत दिस-णाऱ्या, अशा त्यांच्या बाह्य दृष्टीला दिसतात; परंतु संतांच्या संस्कृतीमुळें व त्यांच्या अप्रतिम शिकवणीमुळें ज्या सूक्ष्म पण दृढ रज्जूंनीं आम्ही सर्व जखडून बांधले जाऊन बाह्यात्कारीं निराळे दिसणाऱ्या अंतिम ध्येयासंबंधानें एक कसे आहोंत, याची जाणीव त्यांना असणें कठीण आहे.

म्हणून सर्व प्रकारच्या,सर्व धर्मांच्या स्त्री पुरुषांस स्वोन्नतीचा योग्य मार्ग सुलभ रीतीनें प्राप्त होवो, ही श्री साईबाबांच्या पायापाशीं आदरयुक्त नम्र प्रार्थना करून हा लेख आटोपता घेण्याची त्या परम दयाळू सद्गुरु माउलीची व सूज्ञ वाचकांची आज्ञा घेतों.

ता. २५--६--३१. } " **म्हातारा** "

# अहिंसा परमोधर्मः

( भगवद्गीता, अ. १३, श्लोक ७, पाद. २ )

श्रीसांईलीलाकर्ते यांस निलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे, मु. पुणें, यांचे कृ. सा. न. वि. वि.

परमप्रिय मित्र कै. हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित यांनीं मला शिर्डीस सुमारें सन १९१७ मध्यें जो आपला एक स्वानुभव सांगितला होता, तो साईलीलेंत प्रसिद्ध झाला नाहीं, असा माझा समज आहे. ह्यास्तव तो आपणांस ह्याखालीं लिहून कळवीत आहें.

सर्प हा जीव घातक असल्यामुळें तो आपल्या दृष्टीस पडला तर त्याला मारावें किंवा नाहीं, असा प्रश्न श्रीबाबांना एकदां भाऊसाहेबांनीं विचारला असतां बाबा म्हणाले कीं, "आपण त्याला कधींही मारूं नये; कारण तो देवाच्या हुकुमाशिवाय आपला घात करणार नाहीं, व देवाचा हुकूम झाला असल्यास तो आपल्याला टाळतां येणार नाहीं." हें उत्तर ऐकून तदनुरोधानें वागण्याचा भाऊसाहेबांनीं पक्का निश्चय केला आणि पुढें थोडक्याच दिवसांत एकदां....ते प्रातर्विधि आटोपून प्रार्थनेस्तव श्रीबाबांच्या तसबिरीपुढें जाऊन उभे राहिले,तों त्यांना त्या तसबिरीवर एक मोठा सर्प दिसला. तो पाहून भाऊसाहेब प्रथमतः दचकले; परंतु त्यांना लागलीच बाबांच्या उपदेशाची आठवण होऊन स्वतः बाबाच आपली कसोटी पाहाण्या-स्तव सर्परूपानें तेथें प्रकट झाले आहेत, अशी त्यांची भावना झाल्यामुळें त्यांनीं त्या सर्पास नमस्कार करून म्हटलें कीं, "बाबा ! आम्ही मित्रीं माणसें अशा कसोटीस कशीं उतरणार ! आपण तसबिरीवर आहांत तोंपर्यंत तस-बिरीला गंधपुष्पें वाहण्याची माझी छाती होत नाहीं. ह्यास्तव आपण कृपा करून आतां येथून मुकाट्यानें दूर जावें." अशी त्यांनीं प्रार्थना केल्याबरोबर तो सर्प तसबिरीवरून उतरून कोठें गेला, तें भाऊसाहेबांना दिसलें नाहीं; कारण तो हालल्याबरोबर जवळ निजलेल्या मंडळीच्या बिछान्याकडे त्यांची दृष्टि लागलेली होती. भाऊसाहेबांनीं नंतर प्रथमतः तसबिरीला गंधपुष्पें वाहून

मग मंडळीला जागें केलें, व सर्व खोली चांगली झाडून पाहिली; परंतु त्यांना तो सर्प तेथें पुनः मुळींच दिसला नाहीं. असो. परमपूज्य मित्र साधुवर्य कै. विनायक रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन यांच्या घरीं ह्यापेक्षांही अतर्क्य असे सर्पाचे अनुभव त्यापूर्वी मला दोनदां आलेले असल्यामुळें मला बाबांच्या त्या लीलेचा मुळींच चमत्कार वाटला नाहीं. सत्पुरुषांच्या सामर्थ्यानें अशा लीला सहज होत असतात. "**चित्त शुद्ध तरीं शत्रु मित्र होती। व्याघ्र न खाती सर्प तया॥**" ह्या संतोक्तीवर विवेकपूर्वक पूर्ण श्रद्धा मात्र पाहिजे; आणि ती नसली तर अशा सहज लीलांसंबंधानें नाना कुतर्क चालणारच. व ह्याचसाठीं "**कल्पनेची बाधा। न हो कदा काळीं॥**" अशी श्री ज्ञानेश्वरांनीं देवाला प्रार्थना केली आहे. कळावें. मिति वैशाख शुद्ध ७ शके १८५३.

रा. रा. श्रीसाईलीलाकर्ते यांस नीलकंठ रामचंद्र सहस्त्रबुद्धे यांचे कृ. सा. न. वि. वि. श्रीकृपेंकरून वैशाख शुद्ध द्वितीया शके १८५३ पावेतों डेक्कन जिमखाना, पुणें नंबर ४, येथें क्षेम असो विशेष.

आपले परम मित्र कै. हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित यांनीं मला आपला एक स्वानुभव सांगितला होता, तो सांईलीलेंत प्रसिद्ध झाला नाहीं, असा जो माझा समज आहे तो खरा असल्यास तो प्रसिद्ध करण्याकरितां आपणांस ह्याखालीं लिहून कळवीत आहें.

# सर्वांगपरिपूर्णता.

सुमारें १५ वर्षें होऊन गेलीं. कै. श्रीमंत बापूसाहेब बुटी ह्यांच्या नाशीक येथील पंचवटींतील इमारतींत आपल्या अग्निशाळेसाठीं जागा मिळाली तर पाहावी, अशा हेतूनें पंचवटींतील अग्निहोत्री मुळे शास्त्री यांनीं शिर्डी येथें बापूसाहेबांची गाठ घेऊन त्यांना आपला हेतु कळविला; तेव्हां आपल्या त्या इमारतींत अग्निशाळेला योग्य अशी जागा नाहीं, असें बापूसाहेबांनीं त्यांना सांगितलें, आणि ती सर्व इमारत स्वतः पाहून तेथें योग्य जागा आहे असें वाटल्यास ती देण्याचेंही त्यांनीं कबूल केलें. हें बापूसाहेबांचें म्हणणें ऐकल्यावर इमारत स्वतः पाहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें सांगून शास्त्रीबावांनीं जेव्हां परत जाण्याचा बेत ठरविला, तेव्हां श्री. साईनाथांची आज्ञा घेतल्याशिवाय शिर्डीहून प्रायः कोणीहि परत जात नसल्याकारणानें बापूसाहेबांनीं त्यांना श्रींची आज्ञा घेऊन परत जावें, असें सुचविल्यामुळें ते म्हणाले कीं, "मशीदींतील भ्रष्टपणाशीं कोणत्याही प्रकारें आपला प्रत्यक्ष संबंध यावा अशी आपली इच्छा नाहीं." हें बोलणें ऐकून बापूसाहेबांनीं सांगितलें कीं, आपणांला मशीदींत कोणाचाहीं स्पर्शसुद्धां होऊं न देण्याची आम्हीं तजवीज करूं आणि आम्हींच आपणांसाठीं त्यांची आज्ञा मागूं. शिष्टाचाराच्या दृष्टीनें हें बापूसाहेबांचें म्हणणें शास्त्रीबावांना मान्य करावें लागलें, आणि दुसरे दिवशीं श्रींची आज्ञा घेण्याचें ठरलें. हें सर्व भाषण जेव्हां श्री. भाऊसाहेब दीक्षित यांच्या वाड्यांत झालें, तेव्हांच तें श्रींच्या अतींद्रियज्ञानानें त्यांना कळलें, आणि दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें ९ वाजतां श्री लेंडीवर जातांना साठे यांच्या वाड्याजवळ जेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं नित्य रिवाजाप्रमाणें मंडळी जमली, तेव्हां श्री म्हणाले कीं, " आज आपल्याला थोडासा गेरू आणला पाहिजे. " ह्या भाषणाचा अर्थ कोणासच न कळल्यामुळें मंडळींनीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. नंतर दुपारच्या आरतीच्या वेळेस सर्व मंडळी जमून अग्निहोत्री मुळे शास्त्री मशीदीच्या सभामंडपांत अगदीं दूरच्या एका कोपऱ्यांत उभे राहिल्यावर आरतीस सुरवात झाली, व आरती चालली असतांना मुळे शास्त्री यांना

प्रथमतः जी मूर्ति साईनाथ रूपानें दिसत होती, तीच मूर्ति नंतर त्यांच्या ब्रह्मीभूत संन्यासी गुरूच्या रूपानें फक्त त्यांनाच दिसूं लागल्यामुळें, ते संचार झाल्याप्रमाणें एकाएकी मशींदींत धांवत गेले, व त्यांनीं श्रींचे पाय घट्ट धरिले आणि आपल्या नेत्राश्रूंनीं त्या पायांवर अभिषेक केला. हा प्रकार पाहून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली; कारण त्या असंभवनीय कृत्याचा हेतु मुळे शास्त्र्यांशिवाय कोणासच कळला नाहीं.

शेवटीं आरती संपून नैवेद्यसमर्पणानंतर सर्व मंडळी मशींदींतून बरोबर जात असतां मित्र कै. भाऊसाहेब दीक्षित यांच्या प्रश्नावरून मुळेशास्त्री यांनीं जेव्हां त्यांना खरा प्रकार कळविला, तेव्हां त्या दिवशीं सकाळीं लेंडीवर जातांना श्रींच्या मुखांतून जे शब्द निघाले होते, त्यांच्या गूढार्थाचा पक्का निकाल लागला.

हा प्रकार मित्र कै० भाऊसाहेब दीक्षित ह्यांनीं जेव्हां मला सांगितला तेव्हां आठवे वर्षापासून ज्याचें मी पुत्रवत् पालन केलें होतें ते कै. हरि गणेश ठकार हे नाशिक येथें मामलेदार असल्यामुळें मीं त्यांना मुळे शास्त्री यांची गांठ घेऊन त्यांचा शिर्डी येथील जो कांहीं अनुभव असेल तो ते सांगतील तशाचा तसाच मला कळविण्याविषयीं मोघम पत्र लिहिलें, आणि नंतर त्यांनीं आपल्या जबाबांत मुळे शास्त्र्यांच्या तोंडचे शब्द म्हणून जो मजकूर मला कळविला त्यांत वरील सर्व प्रकारचें शब्दशः सविस्तर वर्णन होतें.

2:32

सन १९१०-११ मध्यें सद्गुरुसान्निध्यांत माझा जो सुमारें तीन महि-न्यांचा काळ गेला, त्यांत अशा प्रकारचे अनेक अतर्क्य अनुभव आल्यामुळें "यो बुद्धेः परतस्तु सः" (गीता ३-४२) ह्या भगवदुक्तीचें रहस्य मनांत पक्कें बिंबलें आहे. आत्मानात्मविवेकी पुरुषाच्या स्वानुभवास मिथ्या म्हणणें हा अक्षम्य प्रमाद होय; तथापि "A cat may look at a king" असा प्रकार ह्या जगांत नेहमीं चालणारच. कारण " ...

श्री नीळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांस........

श्री. मुळे शास्त्री यांची हकीकत कै. गो. र. दाभोळकर यांनीं आपल्या श्री साईसच्चरिताच्या बाराव्या अध्यायांत (पानें २११-२१८) उत्कृष्ट रीतीनें वर्णिलेली आहे. तरीपण त्याच गोष्टीविषयीं आपण स्वतंत्र रीतीनें तपास करून ती लिहून पाठवीत आहांत हें आपणांस श्रेयस्कर आहे. सबब ती हकीकत गद्यरूपानें आपल्या लेखणींतून जशीच्या तशीच छापल्यास तिची केवळ द्विरुक्ति न होतां, अशा हकीकती स्वतंत्र रीतीनें तपास केल्यावरही त्यांचें खरेपण निदर्शनास येतें, ही गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं...........

आपल्या लेखणींतून अशा प्रकारचे आपले अनुभव आपण प्रसिद्धीसाठीं पाठवून श्रींच्या भक्तमंडळीस कृतार्थ कराल, अशी पूर्ण उमेद व आशा आहे..

आपला,

**रा. आ. तर्खड**

संपादक:—श्रीसाईलीला.

कल्याण । आपुलें उभयतांचें जाण । साई महाराज कृपाघन । वळे-घेल आपणावरी ॥ २४२ ॥ जे या साईचरित्रासी । श्रवण करितील प्रेमेंसी । त्यास रक्षील हृषीकेशी । सत्यसत्य त्रिवाचा ॥ २४३ ॥ पुढील अध्यायीं कथा गहन । त्रिवर्गासी उपदेशकथन । तो उपदेश करितां श्रवण । पुरुषार्थ चारी साधतील ॥ २४४ ॥ दास गणूचे बोबडे बोल । तुम्हीं ऐका हो भक्तप्रेमळ । साईचरणीं अर्पितां भाळ । इच्छा पुरतील मनींच्या ॥ २४५ ॥ याचें जो करी पारायण । त्याचे पापा होय दहन । पाठी राखील नारायण । तयाची ती सर्वदा ॥२४६॥ स्वस्तिश्री भक्तलीलामृत । रम्य बाबांचें पवित्र चरित्र । हें केवळ परमामृत । सेवा सेवा गणू म्हणे ॥ २४७ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभंभवतु ॥ ॥ ॥

॥ इति एकत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय ३२ वा.

श्रीगणेशाय नमः ॥ हे चित्स्वरूप सर्वेश्वरा । आनंदमूर्ते उदारा । स्वयं प्रकाशा निर्विकारा । सर्वावस्थातीत तूं ॥ १ ॥ ऐसें तुझें अगम्य रूप । मी न जाणे मायबाप । जेथें वेदही साक्षेप । नेति नेति म्हणतसे ॥ २ ॥ वसिष्ठ भृगू पाराशर । जे ज्ञान नभींचे भास्कर । यांनाही तुझा न लागला पार । मग मी तेथें काजवा किती ॥ ३ ॥ हें असो दे कांहीं देवा । परी मी तुझा करितसे धांवा । मम मनीं वास करावा । हा ग्रंथ वदविण्यास्तव ॥ ४ ॥ तया शिर्डी ग्रामासी । आले साईच्या दर्शनासी । नानासाहेब पुण्यराशी । दुसरे नाना निमोणकर ॥ ५ ॥ चांदोरकरांनीं पदीं माथा । ठेवून बोलले तत्वतां । हें साई महाराज समर्था । पुरे आतां हा संसार ॥ ६ ॥ अवघीं शास्त्रें संसाराशीं । निःसार आहे म्हणती ऐशी । ह्या प्रपंचरूप श्रृंखलेसी । तोडीं सत्वरीं दीनबंधो ॥ ७ ॥ जों जों सुखाची हांव धरावी । तों तों दुःखाची स्वारी व्हावी । आशा सटवी नाचवी । ठाईं ठाईं आम्हांला ॥ ८ ॥ शोधूं जातां संसारांत । सुखाचा न लेश सत्य । मी कंटाळलों त्याप्रत । नको संबंध तयाचा ॥ ९ ॥ ऐसें ऐकतां त्यांचें भाषण । बाबा बोलले हांसून । हें भक्तेंच वेड्या मोहक ज्ञान । कोठून तुज उदेलें ॥ १० ॥ तुझी आहे सत्य गिरा । परि चुकतोस वेड्या जरा । यावद्देह तावत् खरा । आहे संसार पाठीशीं ॥ ११ ॥ तो न चुकला कोणासी । मग तूं त्या कैसा सोडिसी । तो तोडितां नये मशीं । मीही त्यांत गुंतलों ॥ १२ ॥ संसाराचीं रूपें अनेक । तीं मी सांगतों तुज देख । देहावरी आहे झाक । पहा तया संसाराची ॥ १३ ॥ काम मोह मद मत्सर । यांचा जो कां परस्पर । संबंध तोही संसार । आहे बापा शिष्योत्तमा ॥ १४ ॥ डोळे पदार्थ पाहती । कर्ण ध्वनीतें ग्रहण करिती । रसना रसातें

सेविती। याचेंही नांव संसार ॥ १५ ॥ मनाचे जे जे व्यापार। त्याचेंही नांव संसार। शारीर धर्म साचार। अवघें संसाररूपीं बा ॥ १६ ॥ स्वरूप या संसाराचें। मिश्रण दोन वस्तूंचें। तें हें संसारबंधन साचें। तुटलें नाहीं कोणास ॥ १७ ॥ दारा पुत्र कन्यादिकासी। संसार म्हणती निश्चयेसी। तो मात्र ओखटा तुशी। वाटूं लागला सांप्रत ॥ १८ ॥ दारा पुत्र कन्या जाण। बंधू भाचे पुतणे स्वजन। यांच्या त्रासें सेविलें रान। परी न सुटे संसार हा ॥ ९ ॥ ऐसें वदतां गुरुवर। काय बोलती चांदोरकर। हा शेवटला संसार। नको बाबा मात्र मशीं ॥ २० ॥ या शेवटल्या संसारीं। दुःख होतें नानापरी। वरले संसार निर्धारीं। अवघे ईश्वरनिर्मित ॥ २१ ॥ त्यां न कोणाचा उपाय चाले। ते पाहिजेत अवघे केले। शेवटल्यास मात्र विटलें। मन सोडीव त्यांपासून ॥२२॥ तई बाबा म्हणती हांसत। तो तुझा तूंच केला निर्मित। मग आतां त्याप्रत। कंटाळून काय होतें ॥ २३ ॥ संचित क्रियमाण पूर्वीचें। देह प्रारब्ध फळ त्याचें। हेंच देह प्रारब्ध जन्माचें। आहे मूळ कारण ॥ २४ ॥ तें देह प्रारब्ध भोगिल्याविण। न सुटे कवणा-लागून। तें भोगण्या कारण। प्राणी जन्म पावती ॥ २५ ॥ गरीब मध्यम श्रीमान। प्रापंचिक ब्रह्मचारी जाण। वानप्रस्थ संन्यासी पूर्ण। उच्च नीच अवघे ॥ २६ ॥ घोडा बैल कोल्हा मोर। व्याघ्र गेंडा तरस घार। श्वान बिडाल सूकर। विंचू सर्प मुंग्या पिसा ॥ २७ ॥ ह्या अवघ्यांच्या अस्तित्वासी। प्राण कारण निश्चयेसी। तो प्राण अवघ्यापाशीं। आहे एकसारखा ॥ २८ ॥ मग बाह्य स्वरूपीं भिन्नत्व। कां दिसावें जगतांत। याचा विचार मनांत। केलास कां त्वां कधीं तरी ॥ २९॥ याचा विचार करूं जातां। ऐसें कळों येईल तत्वतां। कीं हें संचित क्रियमाण सत्ता। म्हणोन प्राणी भिन्न भिन्न ॥ ३० ॥ हें मागें वर्गीकरण। जैसा वर्ग तैसें लक्षण। मग त्या

होय तुज साची । खऱ्या सुखदुःखाची । व्याख्या एक सांगतों ॥६३॥ मुक्ति हेंच खरें सुख । जन्ममरण फेरा हेंचि दुःख । या व्यतिरिक्त दुसरी भ्रामक । आहेत बापा सुखदुःखें ॥ ६४ ॥ असो आतां या संसारीं । तुवां वागावें कैशापरी । हें मी सांगतों निर्धारीं । तिकडे अवधान द्यावें तुवां ॥ ६५ ॥ देह प्रारब्धानुरोधें । प्राप्त स्थिती तिच्यामध्यें । आनंद मानूनी रहावें बुधें । खोटी तळमळ करूं नये ॥ ६६ ॥ घरीं आलिया संपत्ति । आपण नम्र व्हावें अति । फळें येतां लीन होती । वृक्ष जैसे शिष्योत्तमा ॥ ६७ ॥ हें नम्र होणें चांगलें । परी न सर्वाठायीं भलें । दुष्ट दुर्जन ओळखिलें । पाहिजेत पुरे या जगतीं ॥६८॥ कां कीं धनिक नम्र होतां ।यांना फावे तत्वतां । म्हणून दुष्टीं कठोरता । धरिली पाहिजे मानसीं ॥६९॥ साधु संत सज्जन । यांचा राखणें मान । लीन व्हावें लव्हाळ्याहून त्यांचे ठायीं सर्वदा ॥ ७० ॥ श्रीमंती दुपारची छाया । हें न जावें विसरूनियां । धन मद अंगीं आणूनियां । न छळी कोणा निरर्थक ॥७१॥ आपुली प्राप्ति पाहून । दान धर्म करावा जाण । उगीच कर्ज काढून । उधळेपणा करूं नये ॥ ७२ ॥ प्रपंच जरी अशाश्वत । परी तें प्रारब्ध सत्य । तो प्रपंच करण्याप्रत । द्रव्य अवश्य पाहिजे ॥ ७३ ॥ शरीरीं जैसी आवश्यकता ।आहे पित्ताची तत्वतां । तैसी प्रपंचीं ज्ञानवंता । आहे या धनाची ॥७४ ॥ अवश्य वस्तु जरी हें धन । परी त्यांतची न गोवीं मन । राहूं नको कदां कृपण । उदार बुद्धि असावी ॥ ७५ ॥ परी फाजील उदारता । नाहीं कामाची सर्वथा । द्रव्य अवघें संपून जातां । कोणी न विचारी मागुनी ॥७६॥ उदारपण उधळेपण । या दोघांची सांगड जाण । एके ठिकाणीं घातल्या पूर्ण । होईल बापा अनर्थ ॥ ७ ॥ द्रव्य दानीं पहाणें योग्यता । तैसीच त्याची आवश्यकता । याचा विचार तत्वतां ।

मुलें समस्त । एखादें सार्वजनिक । कृत्य योग्य द्रव्यदानासी ॥७९॥ तैसीच योग्य विद्वाना । पाहून करी संभावना । अनाथ स्त्रीच्या बाळंतपणा । यथाशक्ति मदत करी ॥८०॥ अन्नदानाचे प्रकार तीन । विशेष नित्य कार्या कारण । विशेष जें कां अन्नदान । तें केव्हां करावें ॥ ८१ ॥ घरीं संपत्ति बहु आलिया । काळ अनुकूळ असलिया । सदिच्छा मनीं झालिया । सहस्रभोजन घालावें ॥ ८२ ॥ तेथें उच्च नीच भेद नाहीं । तें चहूं वर्णीं श्रेष्ठ पाही । सुष्ट दुष्ट अवघेही । योग्य या अन्नदानातें ॥ ८३ ॥ भंडारा अथवा प्रयोजन । हे याचेच भेद पूर्ण । परी हें कर्ज काढून । करूं नये कदांही ॥ ८४ ॥ आतां नित्य अन्नदानासी । योग्य कोण सांगतों तुशीं । पांथिक तापसी संन्यासी । तडी तापडी भुकेलेला ॥ ८५ ॥ मागुनियां कोरान्न । जे करिती विद्यार्जन । ऐशा माधुकऱ्या लागून । नित्यान्न घालावें ॥ ८६ ॥ लग्न मौंजी ऋतुशांति । सण व्रतोद्यापन निश्चितीं । या अवघ्या प्रसंगाप्रति । कार्या कारण म्हणावें ॥८७॥ या कार्या कारण प्रसंगास । बाहणें इष्ट मित्रास । आप्त सखे सोयऱ्यास । आदरें द्यावें अन्न बापा ॥८८॥ हे अन्नदानाचे प्रकार । तुज कथिले साचार । योग्या योग्य विचार तोही पैं कथन केला ॥८९॥ वस्त्रदानाची हीच स्थिती । हें विसरूं नको कल्पांतीं । आपुल्या अंगीं असल्या शक्ति । पर पीडा नित्य निवारावी ॥९०॥ हातीं कांहीं असलिया सत्ता । तिचा दुरुपयोग न करणें सर्वथा । न्यायासनीं बैसतां । लांचलुचपत घेऊं नको ॥ ९१ ॥ ज्या कार्याची जबाबदारी । नेमिली असेल आपुल्या शिरीं । तें कार्य उत्तम करी । वाहून काळजी तयाची ॥ ९२ ॥ वाजवीपेक्षां फाजील देख । न करावा पोषाख । अहंपणाची झांक । आणून तोरा दावूं नको ॥९३॥ कांहीं नसतां कारण । कोणाचा

कन्या पुत्र दास दासी। ह्या देह प्रारब्धें प्राप्त तुशीं। झाल्या असती तयाशीं। वागवावें प्रीतीनें ॥९५॥ दारा पुत्र कन्या स्वजन। या माझें माझेंचि म्हणून। मनीं वाहतां अभिमान। कारण जन्ममरणासी ॥९६॥ कां कीं हें देह प्रारब्ध सकल। येथेंचि अवघें सरेल। त्याचा लेशही न उरेल। अंतीं संगति यावया ॥९७॥ या अवघ्यांची महति। आहे याच जन्मा पुरती। मागल्या जन्मींचे निश्चितीं। कोठें आहे गणगोत ॥९८॥ ते ज्या त्या जन्मींच सरून जाते। वासना मात्र बद्ध करिते। तीच वासना कारण होते। पुढलिया जन्मासी ॥९९॥ ह्मणून या स्वकीयांचा। खोटा मोह न वाही साचा। तरीच अक्षय सुखाचा। लाभ होईल तुजलागीं ॥१००॥ जैसे आपण धर्मशाळेंत। जातों क्षणेक रहाण्याप्रत। तात्पुरती सोय येथ। घेतों आपण करूनि ॥१०१॥ ह्मणून त्या धर्मशाळेचा। मोह ना आपणा उपजे साचा। तोच प्रकार येथीचा। प्रपंच ही धर्मशाळा ॥१०२॥ ऐसें प्रत्येकानें वागावें। कर्तव्य आपुलें करावें। तें करीत असतां ओळखावें। सच्चिदानंद ईश्वरा ॥१०३॥ पुत्र आपला आणि पराचा। निर्माण-कर्ता एकचि साचा। परी आपुल्या पुत्राचा। भार स्थापिला आपुल्या शिरीं ॥१०४॥ ह्मणून त्याचें संगोपन। करोनि उत्तम शिक्षण। द्यावें थोडें बहुत धन। त्यासाठीं ठेवावें ॥१०५॥ परंतु मीच पुत्रास पोशिलें। मीच त्यास शिक्षण दिलें। मीच त्यासाठीं ठेविलें। धन ऐसें मानूं नको ॥१०६॥ कर्तव्य आपण करावें। कर्तृत्व ईश्वरा द्यावें। फलही त्यासच समर्पावें। अलिप्त आपण रहावया ॥१०७॥ ज्ञानाचा करून उपयोग। बरें वाईट जाणे सांग। जे जे बरें त्यासी अंग। देऊन वाईट टाकावें ॥१०८॥ उत्तम कार्य हातीं घ्यावें। तें तें नाना प्रयत्नें शेवटास न्यावें। कीर्तिरूपें उरावें। मागें मरून गेल्या-

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दश: प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

अंक ९, वर्ष ८ ] कार्तिक [ शके १८५३

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका:

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

पुण्यतिथि कीर्तनाख्यान ... ... ... ... १-२८

श्री शिरडी संस्थानचा शके १८५२ सालचा
जमाखर्चाचा आढावा

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक.

श्रीदत्तचित्साइ सद्गुरुभ्योनमः

# पुण्यतिथि कीर्तनाख्यान

## नमन

श्रीगणेशायनमः। सजयति सिंदुरवदनो देवो यत्पाद पंकज स्मरणंम्। वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम्।

### १ पद

( रामदास माउली० या चालीवर )

दयाघन माउली। माय माझी दत्तराज माउली॥
दत्तराज माउली गे। माय माझी ज्ञानराज माउली॥
ज्ञानराज माउली गे। माय माझी साइराज माउली॥
लपुनी जगतीं सूत्र ओढिते। हलवि चराचर बाहुली॥ माय माझी॥१॥
भवभय तापें तप्त दास हा। करिं करुणेची साउली॥ माय माझी॥२॥
काममदादिक गांजिति निशिदिनिं। दूर करिं अहितांवली॥ माय माझी॥ ३॥
दीन बाळ तव, नमुनी विनवी। ठाव देई तव पाउलीं॥माय माझी॥४॥

### २ अभंग

( गौरीशंकर पुजिला ज्यांनीं० या चालीवर )

शरण साई चरणीं गेला। त्यानें भवबंध तोडिला। त्यानें॥ १॥
हाणि कालासी तो लाथा। काल ठेवी तत्पदिं माथा॥ काल॥ २॥
ऐसा संतांचा अधिकार। साइ संतांचें सरकार॥ साइ॥ ३॥
करुं सरकारा मूजरे। आपण चरणाचे हूजरे॥ आपण॥ ४॥
नलगे गुप्त मुक्ती ठेवा। अन्य भक्तांना तो द्यावा॥ अन्य॥ ५॥
बाळ प्रार्थी नित्य मेवा। देई तव पद भक्ती सेवा॥ देइ॥ ६॥

---

१ शत्रुपंक्ती=शत्रुसमुदाय. अहित= शत्रु, अरि, रिपु. आवली-पंक्ती, समुदाय, मंडळ, वृन्द.

३ पद

( नाम तुझें बहुगोड० या चालीवर )

नाम तुझें विष[1]भोग । साई नाम तुझें विषभोग ।
रसना[2] नेघे, वदे, जहर कटु । म्हणुनी होत वियोग ॥ साई ॥ १ ॥
सज्जन वदती नाम मधुर परि । मज कां ये न सुयोग ॥ साई ॥२॥
वैद्य विषाचें बनवि रसायण । तैंचि कळे उपयोग ॥ साई ॥ ३ ॥
नाम विषाचें मधुर रसायण । करुनि दावि विनियोग ॥ साई ॥४॥
धन्वंतरि[3] तूं अखिल जगाचा । सत्वरिं टाळिं कुयोग ॥ साई ॥ ५ ॥
रसायणाचा एकचि वळसा[4] । देउनि पाहिं प्रयोग ॥ साई ॥ ६ ॥
कृपामृताच्या अनुपानासह । झडकरिं हरिं भवरोग ॥ साई ॥ ७ ॥

टाळी महाराज–साइनाथ गुरु माझे आई । मला ठाव द्यावा पायीं ॥

| | | | |
|---|---|---|---|
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु साइनाथ महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु सर्व साधुसंत महाराज की जय.

---

१ विष घेण्यास जसें कठीण तसेंच तुझें नाम मुखीं घेण्यास कठीण. विषाचा भोग भोगण्यास जसें कठीण तसें तुझ्या नामाचा भोग भोगण्यासही कठीण. २ जिव्हा. ३ देवांचे वैद्य. ४ वेढा.

# पूर्वरंग—संतमहात्म्य

४ शार्दूलविक्रीडित

## पुनर्नमन

साक्षान्निर्गुण[1] वस्तु[1] सांडुनि जगत्काया विराटा[2] परा ॥
लीलाविग्रह घेउनीं भुविं असे आली स्वरूपा वरा[4] ॥
जी वाडी[5], अलकेव[6] शैलधिमधीं[7] ज्यां देखिली सुंदरा ॥
ती श्रीदत्तचिदीश साइजननी मी वंदितों सादरा ॥

## संतमहात्म्य

या अखिल ब्रह्मांडात साधुसंतांचा अधिकार फार मोठा आहे. प्रणवरूप ॐकार ज्यास एकाक्षर ब्रह्म म्हणतात, तें परमात्म्याचें प्रतीक आहे. ब्रह्माविष्णुमहेशादि उच्चतम देवता त्याच्या प्रतिनिधि होत. परंतु हे साधुसंत परमात्म्याचे प्रत्यक्ष सगुणावतार आहेत. कोणत्या वस्तूंत असलेली अदृश्य किंवा अगोचर शक्ति तिला कोणतें तरी एखादें मूर्त शरीर धारण केल्यावांचून कोणास दाखवितां येत नाहीं. सर्व सत्ता, सर्व सामर्थ्य, सर्व वैभव निर्गुण परमात्म्याचें आहे, ही गोष्ट खरी आहे. सर्व विश्वांतील तेजाचे मालक परमात्मा आहेत. ते तेजाची खाण आहेत, ते तेजाचे निधि आहेत, भांडार आहेत, हें सर्वश्रुतच आहे.

"यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥"

श्री. भ. गी. अ. १५

याप्रमाणें श्रीकृष्ण परमात्म्यांनीं अर्जुनास सांगितलें आहे. तथापि सूर्यचंद्रादि देवतांचीं शरीरें निर्माण केल्यावांचून परमात्मतेज विश्वाला ज्ञात होत नाहीं. म्हणून परमात्मशक्ति ज्ञात होण्याकरितां निर्गुण

---

१ परमात्मा. २ श्रेष्ठ, विराट स्वरूप. ३ शरीर. ४ उत्तम. ५ नरसोबाची वाडी. ६ आळंदी. ७ शिरडी.

वस्तूस साधुसंतांचीं सगुण स्वरूपें किंवा शरीरें धारण करावीं लागतात. मग परमात्म्यास जें करितां येत नाहीं तें साधुसंत करतात. परमात्म्यास जें देतां येत नाहीं, तें साधुसंत देतात. संतांचें ऐश्वर्य अफाट, सामर्थ्य अचाट, पराक्रम प्रचंड, शक्ति अतुल व सत्ता अपार. ब्रह्मप्राप्तिमार्गदर्शक संत, मोक्षज्ञानदाते संत, सेवा करण्यास योग्य संत, चालते बोलते कल्पतरु संत, चालते बोलते चिंतामणी संत, चालत्या बोलत्या कामधेनु संत, चालते बोलते परीस संत, निर्गुण वस्तूचें सम्यक् ज्ञान करून देणारे संत होत.

## परमात्म सम्यक् ज्ञान

५ दिंडी

**जरी सम्यक् परमात्म ज्ञान व्हावें । असे वांच्छा मनिं संतपद रिघावें ॥**
**दास्य सर्वस्वें तनु मनें तसें जीवें । सकल अभिमाना रहित तें करावें ॥**

श्री. ज्ञा. अ. ४, श्लो. ३४, ओ. १६५-१६७.

सदैव आपले शरीरांत असून हरवलेल्या अथवा चुकामुक पडलेल्या परमात्म्यास शोधावयाचें असल्यास त्यांना संतांजवळ शोधावें.

## हरवलेल्या परमात्म्याचा शोध

६ आर्या

**जरि हरपला निजात्मा संतापाशींच त्यासि गिंवसावें ॥**
**वानावें यश गावें संतांचे गुण सदैव परिसावे ॥ १ ॥**

श्री. ज्ञा. अ. १८, श्लो. १६, ओ. ४००.

अशा परमोच्च योग्यतेचे जे संत त्यांना परमात्मा डोक्यावर घेऊन नाचतात, त्यांना आपले देव मानतात. त्यांना त्यांचें वेड लागतें. त्यांना पाहातांच परमात्म्यास समाधान वाटतें व संतोष होतो. परमात्मा त्यांचें ध्यान करितात. संतांशिवाय त्यांना दुसरें कांहींच चांगलें दिसत नाहीं. त्यांच्यावांचून ते इतरांना मान देत नाहींत. संत हे परमात्म्याचे लाडके व प्रिय आहेत.

संतुष्टः सततं योगी । यस्मान्नो द्विजते लोको । अनपेक्षः शुचिर्दक्षः । योनहृष्यति न द्वेष्टि । समः शत्रौच मित्रेच । तुल्य निंदा स्तुति मौनी । येतु धर्म्यामृत मिदं ॥

श्री. भ. गी. अ. १२, श्लो. १४ ते २०

## परमात्माना संत फार प्रिय

७ पद

( प्रीति जी दुज्याबर मोठी० या चालीवर )

वंदु त्यांतनु मनुवाचें । नाचु त्यां शिरीं धरु साचे ॥ कीरिटी॥ ध्रू०
साहुं टांचें[2] हृदयीं त्यांची । मानु ती खूण[3] विजयाची ॥ कीरिटी॥१॥
करुं आम्हि तयाचें ध्यान । ते आमुचें देवस्थान ॥ कीरिटी ॥ २ ॥
गोमटें[4] न त्या सम आन[5] । देऊं ना इतरां मान ॥ कीरिटी ॥ ३ ॥
नर वरा, रणधुरंधरा, अति प्रियकरा, व्यसन मज त्यांचें, व्यसन मज त्यांचें । ते मिळतां तें शर्म[6]न नयनांचें ॥ कीरिटी ॥ ४ ॥

श्री. भ. गी. अ. १२, श्लो. १७, १९, २०,

ओ. १३६, १८८, व २२१.

यावरून परमात्मापेक्षा संत श्रेष्ठ आहेत हें उघड व निर्विवाद आहे. जड जीवांना परमात्मापेक्षा निःसंशय सगुणावतार संतांचेंच श्रेष्ठत्व जास्त. निर्गुण अव्यक्ताची भक्ति फक्त एक ज्ञानी माणसासच साधते, पण ती अत्यंत क्लेशानें व कष्टानें. इतर आर्त, जिज्ञासु व अर्थाअर्थी भक्तांना ती साधतच नाहीं. अशा भक्तांना सगुण भक्तीच उपयोगी. स्वतःच्या बाहुबलानें अफाट व अमर्याद सरित्पती तरून जाण्याइतकी क्लेश मय निर्गुण भक्ति. सहकुटुंब सहपरिवारें नौकेंत बसून जलनिधि तरून जाण्या- इतकी सोपी सगुण भक्ती. निर्गुण परमात्मा प्रत्यक्ष कार्यकर्ते नाहींत. सगुणा-

१ संतांना, ज्ञानी भक्तांना. २ लाथ ( श्रीभृगुऋषिची ). ३ चिन्ह—श्रीवत्सलांछन ४ चांगलें. ५ दुसरे. ६ शांति, समाधान.

वतार संत प्रत्यक्ष कार्यकर्ते आहेत. अव्यक्त किंवा निर्गुण परमात्मा व व्यक्त किंवा सगुणावतार संत यांचें नातें किंवा यांचा संबंध, सर्व चराचर विश्वास निमिषार्धात आपल्या प्रखरतम मयूखांनीं संतप्त करणारा, नित्य रसरसलेला विराट स्वरूपाचा तेजोगोल श्रीसूर्यनारायण व तदंश बरोबरीं नित्य पेटणाऱ्या प्रत्येक चुलीतील लघु आकाराचा सुटसुटित हातांत घेण्यासारखा किंवा खिशांत ठेवण्याजोगा श्रीअग्निनारायण, यांच्यासारखा आहे.

## जगास परमात्म्यापेक्षा संतांचाच उपयोग जास्त

८ आर्या

**करि संतप्त जगातें दिनमणि[1] आत्म प्रचंड दुष्किरणीं[2] ।।**
**परि पाकसिद्धिकार्यीं वन्हिजसा योग्य ना तसा तरणी ।।**

सारांश पाकसिद्धीच्या कामीं जसा प्रखर रश्मी सूर्यनारायण उपयोगी पडत नाहीं, पण त्याचींच किरणें सूर्यकांत मण्यावर पाडून त्यापासून उत्पन्न केलेला तदंश जो अग्नि तो उपयोगी पडतो; त्याप्रमाणें अव्यक्त, अगोचर, निर्गुण, मूक वृत्तीचे परमात्मा जडजीवांना तारून नेण्यास उपयोगी पडत नाहींत. पण त्यांचेच अंश सगुणावतार नित्य व्यक्त, नित्य गोचर, नित्य बोलके असे जे संत तेच जडजीवांना तारून नेण्यास उपयुक्त असतात. परमात्म्यांना तरी साधुसंत इतके प्रियतम कां ? व त्यांना परमात्म्यांनीं आपल्यापेक्षांही जास्त अधिकार कां देऊन ठेविले आहेत ? याचें कारण ज्या परमात्म्याचें नांव एक वेळमुखांत यावयास सहस्र जन्म घ्यावे लागतात तें नांव संतांचे जिव्हेवर निरंतर नाचत असतें.

## सहस्रजन्म

९ दिंडी

**वदे ज्ञानेश्वर माय संत सांचे[3] । असति निर्गुण ईशस्य सगुण सांचे[4] ॥**
**नाम घेण्या मुखिं एकवार त्यांचें । पडति फेरे कीं जन्म सहस्राचें ॥**

श्री. ज्ञा. अ. ९, श्लो. १४, ओं. २०६.

१ सूर्य. २ तापदायक दुष्ट किरणांनीं. ३ खरोखर. ४ ठसे.

## संताच्या जिव्हेवर देवाचें नांव नेहमी नाचत असतें.

१० साकी

पूज्य न कां तें दैवत होतिल साधुसंत देवाचे ॥
वाचेवरि देवाचें त्यांच्या नाम निरंतर नाचे ॥
ऐसे संत जगीं । दुर्मिळ तरि या दुरित युगीं ॥

वरील कारणामुळें परमात्मा हे संतांना विकले गेले आहेत. परमात्माला यांचें वेड लागलें आहे, व्यसन लागलें आहे, छंद लागला आहे, नाद लागला आहे. परमात्मा नक्की कोठें आहेत, हें पाहावयाचें असल्यास त्यांना वैकुंठांत, भानुबिंबांत, अथवा योग्यांच्या ध्यानसमाधींत शोधून उपयोगाचें नाहीं. ते तेथें मिळणारच नाहींत. तर सज्जन भक्त ज्या ठिकाणीं अहोरात्र परमात्मनामाचा गजर अथवा घोष करीत असतील त्या ठिकाणीं ते नक्की व बिनचुक सांपडावयाचे.

भगवान श्रीसमर्थ ज्ञानेश्वर महाराज लिहितात—

## नामघोषाचे ठिकाणीं परमात्मा सांपडतात.

११ शार्दूलविक्रीडित

वैकुंठीं नच मी असें, नच तसा, मी भानुबिंबीं दिसें ॥
मी योगेश्वर मानसींहि न तसा, ध्यानीं समाधीं वसें ॥
उत्कंठा दृढ ही, असेल जरि कीं, मी सांपडावा अशी ॥
जेथें सज्जन, नामघोष करिती, तेथें पहावें मशीं ॥

करितां देव, परमात्मा, निर्गुण वस्तूची प्राप्ती करून घेण्याची इच्छा असेल तर त्या संतांनाच शरण गेलें पाहिजे.

श्रीसमर्थ तुकाराम महाराज म्हणतात—

## परमात्मप्राप्ति संतांशिवाय नाहीं.

१२ अभंग

जरि व्हावा तूज देव । तरि हा सूलभ ऊपाव ॥
करि मस्तक ठेंगणा । लागें संतांच्या चरणा ॥

असो. आतां आपण परमात्म नामाचा थोडा गजर करूं.

टाळी महाराज —

दत्त चिदीश्वर साईराज । विरिंचि हरिहर श्रीगणराज ॥

( दाहा वेळ म्हणणें )

श्री सच्चिदानंद सद्गुरू दत्त महाराजकी जय.
,, ,, ज्ञानेश्वर महाराज ,,
,, ,, साईनाथ महाराज ,,
,, ,, सर्वसाधुसंत महाराज ,,

( श्रीसद्गुरुराज बाबांच्या समाधीस माळ घालणें व समाधीवर बुका उधळणें. हरिदासबुवांस बुका लावणें; इतरास लावणें. )

( बुका लावण्याच्या वेळीं म्हणावयाचें पद )

## स्तवनानें सद्गुरुची महति कशी वाढेल ?

१२ पद

( नाम तुझें बहु गोड रामा नाम तुझें बहु गोड० या चालीवर )

संत चक्रवर्ती । साई संत चक्रवर्ती ॥ धृ ॥
चढवुनि कुसुमें कल्पतरूवरि । कोण वाढवी कीर्ती ॥ १ ॥
शिजवुनि सुंदर सुधारसातें । कोण वाढवि ख्याती ॥ २ ॥
केवि सुगंधें चर्चुनि चंदन । वाढवि कोण द्युती ॥ ३ ॥
पाहुणचारें क्षीरोदधिची । वाढवि कोण स्फिर्ती ॥ ४ ॥
नेवीं स्तवनें कोण वाढवी । सद्गुरुची महती ॥ ५ ॥

**पूर्वरंग समाप्त.**

# उत्तरंग आख्यान

## प्रारंभ

### नमन

### वंदन

१४ शार्दूलविक्रीडित

ज्या आदी नच मध्य अंत परि जो, ब्रह्मांड-भांडोदरा ॥
व्यापूनी न दिसे, पयीं घृत जसें, इक्षूरसीं शर्करा ॥
ओढी मायिक विश्वसूत्र लपुनी विश्वासि जो आसरा ॥
साष्टांग प्रणती तया नटवरा, श्री साइ विश्वंभरा ॥

### बाबांचें नांव, जात, कुल

१५ पृथ्वी

न नाम कुल जाति त्या, जननि तात ना आसरा ॥
न दार भगिनी सुता तनय सासु ना सासरा ॥
परी अखिल होउनी, जगिं नटे, स्वयें, येकला ॥
कळा[4]निधिस ही न ही विण नटे[5]श्वरा, ये, क[6]ळा ॥

### बाबा प्रथम दिसले तें गांव

१६ साकी

निजाम प्रांतीं धुपखेड्यामधिं प्रसिद्ध पाटिल राहे ॥
चांगा नामें सधन सुदैवी, संत प्रेम मनिं वाहे ॥
जाती यवनांची ॥ भक्ती अल्लावर साची ॥

---

१ सुवास. २ कीर्ति. ३ ब्रह्मांडरूपी भांडें हेंच पोट. ४ चंद्र. ५ नटेश्वरावाचून. ६ कौशल्य, विद्या, चातुर्य.

## प्रथम बाबा दिसलें तें ठिकाण

१७ दिंडी

चुकलि होती घोडि त्या पाटलाची ।
फिरत होता शोधीत रानमाची ॥
फिरत फिरतां पातला एक मार्गीं !
जेथ दिसला तरुतळीं बाल जोगी ॥

## बाबा चांग पाटलास हाक मारतात

१८ घनाक्षरी

आवो आवो भाई आवो । भाइ तमाखू चिलीम लेवो ॥
तुम बी पीओ हमकु पिलाओ । दवडत कायकु है ॥

## येत नाहीं म्हणून चांग पाटील सांगतो

१९ घनाक्षरी

चुकगइ बाबा घोडी मेरी । नहिं चहिये अब चिलीम तेरी ।
वख्त नहिं मुझे होत है देरी । मय नहिं आउंगा ॥

## घोडी कोठें आहे तें बाबा सांगतात

**२० पद** ( चाल ठुंबरीची—जलभरनजा जमुनाके घाट० या चालीवर )

सुनकर ले रे भाई प्यारी । सुनो सुनोजी बात हमारी ॥ धृ ॥
धुंडत कायकु सबही जंगल । घोडि चरत है इदरहि तेरी ॥ १ ॥
इस कुपणोंके पैलितरफ है । लेता कायकु तखलिप भारी ॥ २ ॥
आंख खोलके देखो भाई । कायकु करत है इतनी देरी ॥ ३ ॥ सु०

## पाटील बाबांचे जवळ आला

२१ शार्दूलविक्रीडित

घोडी देखुनि तेथ पाटिल मनीं अत्यंत आनंदला ॥
वाचा सत्य असेचि जाणुनि मनीं त्या संन्निधी पातला ॥

जोगी बाल फकीर बोलत तया, चीलीम आतां करी ॥
घेई, घालि तमाखु पी, प्रथम तूं, देई मला नंतरी ॥

## चिलीम तयार करून बसला, अग्नि नाहीं

२२ कामदा

करि तयार तो चिलिम सत्वरी । वन्हि ना मिळे परि वनांतरीं ॥
जवळि ना दिसे पेटि पाटला । चांग शेवटीं स्तब्ध बैसला ॥

## बाबांनीं चिमटा ठोकून अग्नि काढला

२३ मालिनी

बघुनि मग फकीरें स्तब्धता पाटलाची ॥
निज करिं चिमटा घे आपटी भूवरींची ॥
अनल[1] प्रकट झाला तत्क्षणीं त्याच भागीं ॥
अनल न निजसत्ता, दावि त्या तो विरागी ॥

## प्रत्यक्ष परमात्मा

२४ पृथ्वी

न जोगि न फकीर तो, परि खुदाच प्रत्यक्ष तो ॥
न किन्नर न यक्ष तो सगुण मूर्त रक्ताक्ष तो ॥
न गारुडि पिशाच तो सदय येशु साक्षाच्च तो ॥
सशक्ति[2] विरुपाक्ष[2] तो सगुण निर्गुणातीत तो ॥

## बाबांचें तेजः तत्वावर प्रभुत्व

पद

( उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर )

सामर्थ्य देखुनी नयनीं, अत्युद्भुत, तेजावरती[3] ॥
कुतुकेंदु[4] उदित[5] हृद्गगनीं[6], प्रेमाब्धिस आली भरती ॥धृ०॥
दाटला कंठ अति मोदें, वदनातुनि शब्द न निघती ॥ १ ॥
तनु कंपित[7] पुलकित[8] झाली, नेत्राश्रू टपटप गळती ॥ २ ॥

१ अग्नि. २ गौरीसह शंकर. ३ तेजतत्वावर. ४ कौतुक किंवा कुतूहलरूपी चंद्र. ५ उदय पावला. ६ हृदयरूपी आकाशांत. ७ कांप लागली. ८ रोमांच उठले.

चाल:--मग नमी, विनवि ओ साई । चलो मेरे घरकु गुरुभाई ॥
मय बंदा आप इलाई ॥ ३ ॥

चाल:— दर्शन देनेकु मालिक मैया आती । जब आपनी तखदिर खुलती
॥ ४ ॥ सामर्थ्य देखुनी ॥

२६ स्वागता

" एक दो दिन यहीं रहेताहूं । छोडनेकु न जगा चहताहूं ॥
आइंगे कल, अबी नहिं आते " । बाल जोगिकथि यापरि त्यातें ॥

## बाबा प्रथम शिरडीस आले

२७ मंदाक्रांता

तस्मिन्नेवा विरल-विपिने वासरांस्त्री न्विनीय ॥
नीत्वा चांगालय मपि भगै मंडयामास मासान् ॥
तस्यानस्याथचपरिणये गोत्रजैस्तेन सार्धम् ॥
श्री साईश-स्त्रिभुवनगुरुः शैलधी-माजगाम ॥

२८ कटाव

## शिरडी प्रदेश वर्णन

क्षेत्र शैलधी जीर्ण जुनाट । भोंवते श्रीगोदेचे पाट । कृष्ण[1]-भूमि मृदु[2] पीक अचाट । ज्वारी बाजरी गहूं हरबरा । इक्षु[3]-दंडें जणुं चुंबि अंबरा[4] । बागबगीचे । फुलांफळांचे । कोठें कोठें पानवेलिचे । पिंवळी धवळी गंध[5] शेवती । नेवाळीचे घोंस लोंबती । गुलाब गुलछडि गेंद[6]मोगरा । जाइ जुई मंदार[7] कण्हेरी । बकूल चंपक[*] नाना रंगी । तुलसी दूर्वा बिल्व सुरंगी[8] । लिंबू केळीं संत्रि फांकडीं । खरबुज टरबुज मिर्ठी काकडी । जांब जांभळें । मधुर रसाळें । गोड रताळें । काशिफळें भुइमूग भोपळे । दुधे कोहळे । लाल गाजरें ।

---

१ काळी. २ मऊ. ३ ऊंस. ४ आकाशाला. ५ सुवासिक. ६ झेंडू. ६ पारिजातक. * चांपा. ८ एक प्रकारचें अति बारीक पण अति सुवासिक फूल. ९ उत्तम.

कांदा लसूण कंद साजिरे[1]। तीळ खुरासणि मोहरी करडई। तांबोटी अलकोल गवारी। भेंडी कोबी कारलि पडवळ। कृष्ण[2] श्रावण श्वेत[3] घेवडा। चंचन बटवा अंबट चुका। अंबाडी अळुं चणा[4] सुका। मूला मेथी करडी घोळूं। हिरवी मिरची। हिरवी चवळी। सुगंध कोथिंबिर ती कवळी। कोमल आंगीं बारिक वांगीं। यापरि वस्तू पिकती ऐसा। भूमिभाग जो निर्मित करतो। प्रेमें वंदावा साई सद्गुरु तो। संतविनायक तो। सद्गति दायक तो ॥ १ ॥

## गोदावरी वर्णन

२९ कामदा

गौतमी जलं शुद्ध निर्मलं। परम-पावनं शांत-शीतलम् ॥
बाह्य-मंतरं प्राणि-नामलं। नित्यनाशकृच्चाल्प चंचलम् ॥

## दुसरे ज्ञानेश्वर

३० आर्या

या पुण्य तीर्थ क्षेत्रीं षट्षष्ठी[5] दिव्य वत्सरा[6] पूर्वी ॥
अवतरले श्री साई दुसरे श्री ज्ञानदेव या ऊर्वी[7] ॥

## बाबांची १६ वर्षांची मूर्ती

३१ आर्या

कमनीय[8] कृष्णमूर्ती जैसी प्रकटे अयोनिजा[9] ऽष्ट[10] समें[11] ॥
षोडश वर्षा प्रकटे तशि साई शांत मूर्ति विष्णुसमें[12] ॥

## कै. काकासाहब लिहितात

३२ साकी

म्हणती कोणी शैलधि माजी बाबा प्रथमचि आले ॥
जैं श्री खंडेराय मंदिरा भीतरिं[13] ते तैं शिरले ॥

---

१ सुंदर. २ काळा. ३ पांढरा. ४ सुक्या हरभऱ्याच्या पाल्याची भाजी ५ साहासष्ट. ६ वर्षीपूर्वी. ७ पृथ्वींत. ८ सुंदर. ९ मातापितरांवाचून. १० आठ ११ वर्षांची. १२ सारखी. १३ आंत

## साईबाबा हें नांव कसें आलें

३३ साकी

" आचो साईबाबा " ऐसें भक्त रत्न स्वर्वासी[१] ॥
मंदिरस्थित[२] म्हाळसा[३] पतिनीं संबोधियलेत्यासी[४] ॥

## मशिदींत राहूं लागले

३४ साकी

नेउनि ग्रामा माजि जागले शिंपी[५] यांच्या गांठी ॥
दिलि घालुनि त्या मूर्तीची[६] जी छेदि जन्म[७]-क्षय गांठी[८] ॥
राहे तो जोगी । मशिदिमधि मग बालविरागी ॥

## कै. आण्णासाहेब लिहितात

३५ इंद्रवज्रा

श्री निंब वृक्षातलिं बालमूर्ती । चैतन्य-बीजांकुर[९] धन्य कीर्ती ॥
कीं ती गमे सावयवा[१०] विरक्ती[११] । कीं मूर्त[१२] शांती परमात्म शक्ती॥

३६ साकी

त्या स्थलिं संध्याकालिं आईनें चोपदार नानांचे ॥
देखुनि मूर्ती सर्वा आधीं केलें सार्थक नयनांचें ॥
भाग्याची थोरी । लज्जित अंतरिं सुरनारी ॥

३७ लावणी

( जाउ नको रे विषयारविंची० या चालीवर )

उडूनि गेली मग ती तेथुनि चैतन्य--कला[१३]--कामिनी ॥
मशीद भूमीमाजि स्थिरावे, जशि चंचल सौदामिनी[१४] ॥ ध्रु० ॥
राहे तेथें नेत्र कटाक्षें[१५] भक्त--चित्त तोषवी ॥
स्तनपानाविण क्षुधा पिलांची भागवि[१६] जशि कासवी[१७] ॥ १ ॥

---

१ स्वर्गवासी. २ मंदिरांत बसलेले भक्त. ३ सोनार जातीचे. ४ हांक मारली. ५ आपा जागले व काशिराम शिंपी. ६ बाबांची. ७ जन्म मृत्यु. ८ ग्रंथी. ९ ब्रह्मबीजास फुटलेला अंकुर. १० अवयवसहीत. ११ वैराग्य. १२ मूर्तीमंत. १३ ब्रह्मकलास्वामिनी. १४ वीज. १५ पाहणें. १६ भूक. १७ स्त्री-कासव.

चालः–आणि मागुनि खावया शिळि भाकर तूकडे । कि भाकर तूकडे ॥
तशि तेल तमाखू धुनिची ही लांकडें । कि धुनिची ही लांकडें ॥
निशिं पेटवि पणांतित घालुनि बहु कांकडे । कि बहु कांकडे ॥
चालः–चिलीम फुंकी दिसे निदेली जागृत रात्रं[1] दिनीं ॥ प्रकाश देउनी भक्ता ऽज्ञाना नाशी जैशी रवि रजनी ॥ उठूनि गेली ॥ २ ॥

## मशीदींतील बाबांचा नित्यक्रम

३८ कटाव

मसीदमाई प्रचंड वाट । गर्जुनि गाठी गौतमी कांठ । भोंवता सद्भक्तांचा थाट । मध्यें आसन शुभ्र सपाट । मागें लोड तक्के दाट । त्यावरी बैसे टेकुनि पाठ । विलसे संतांचा सम्राट । वसन खंड शिरिं वेष्टि निजकरीं । कपाल कफनी कौपिन धारी । शांति विरक्ती निरिच्छ वृत्ती । हात जोडुनी उभ्या राहती । मोहमदादिक स्वप्निं न शिवती । भव भय वृत्ती कृतांत भीती । सुदूर पळती आधिव्याधी । त्या देहला कधीं न बाधी । लोक संग्रहासाठिं उपाधी । ब्रह्मानंदीं मग्न सदाजो । समाधान संतोष जलनिधी । सहज समाधी भोगि निरवधी । देहावरि तो येइ कधिमधी । आर्त जनांना कधी औषधी । वेडि वाकडी कोडि सांकडीं । नमुनी पुसतां शीघ्र उलगडी । मात मनीची कथी तातडी । बोली बोले नाना परिची । विनोद थट्टा करी मस्करी । हांसे कोपे रुसे वरिवरी क्षमानुकंपा वसे अंतरीं । गाळि शिवी दे मारी सटके । फेंकि विटांचे फुटके कुटके । लागति जणुं ते अमृत गुटके । फिरकूं ना दे कोणा जवळीं । थरथर कांपे भक्त मंडळी । चंड रश्मिसम तेज प्रकाशे । कृतांत भासे अथवा रुद्रचि । उग्र भयंकर स्थान सोडुनि । जाइ भराभर धावे परते

[1] रात्र.

यापरि तांडव । करी क्षण भरी शांत होउनि । पुनरपि बैसे निजासनावरि । धारण करि मग रूप मनोहर । मनमोहन मुरलीधर श्रीधर । शामसुंदर देवकि नंदन । कंस निकंदन हांका मारी । कोमल वचनें पुसे परोपरि । अनंत अद्भुत लीला करुनी । डोळे दिपवी अखिल जगाचे । जनमन लावी सगुण भक्तिला । प्रेम उपजवी ज्ञान शीकवी । ऐसा सुंदर ईश सदाशिव । अमोघ वैभव ब्रम्हांडाच्या । रंगभूमिवरि लीला नाटक । नित्य दावि जो प्रेमें वंदावा ॥

## बाबांचें ब्रम्हतेज

३९ स्रग्धरा वृत्तम्

दृष्ट्वा यत्ब्रम्ह तेजः शुचि मधु रुचिरं शीतलं चित्तहारि ॥
पूर्णेंदुः क्षीण कांतिर्भवति किल तथा दर्पको नष्ट दर्पः ॥
श्रुत्वा यत्प्रेमवीचीः प्रियजन विषये लज्जितो भाति सिंधुः ॥
तत्श्री साईपदाब्जे मम नतिततयः कोटिशः संतु नित्यम् ॥

## बाबांचे ठिकाणीं सर्व देवांचें एकीकरण

४० शिखरिणी

अयं साई स्थाणुः किमुत गजतुंडः शिवसुतः ॥
रमाया आहोस्वि द्रमण इति विष्णुः किमपरः ॥
पुनर्गीतां ख्यातुं विजय गुरुकृष्णः किमथवा ॥
अयं साई ब्रम्हा भवतु किमु तस्मै मम नमः ॥

## बाबांच्या संबंधानें इतर संतांचे उद्गार

४१ घनाक्षरी

केडगांविच्या महाराजांचे । दिव्य वचन मम श्रवणीं नाचे ॥
" साइ मुखाक्षर सदैव साचे । पक्के मनिं समजा " ॥

४२ घनाक्षरी

श्री गंगागिर[2] बोलति लोका । आनंद[3] नाथहि वदति विलोका ।
" हिरा लाधला अमोल पक्का । बहु भाग्यें तुमच्या ॥

## बाबांच्या लीला कोणी कोणी लिहिल्या

४४ आर्या

लीला कथानुभव जणुं भक्ति विरक्ती चिदैव हे मांडे[4] ॥
भक्तार्थ[5] रोपिले[6] श्रीसाईसच्चरित[7]मृत हे मांडे ॥

## बाबांचें भाग्य

४५ भुजंगप्रयात

अहो पुण्य राशी अहो भाग्यराशी । परब्रम्ह साक्षाच्चिदानंद राशी ॥
अहो तेज राशी अहो शांति राशी । जगत्पापराशी विनाशी निराशी ॥

४६ भुजंगप्रयात

अहो साइची ये न शक्रास शैली । जरी खर्चि तो स्वर्ग-पुण्याइ-थैली ॥
पराच्या मनीचें अहो गूढ ताडी । तृतीया मुखांतूनि बाहेर पाडी ॥

## बाबांचें वचनामृत

४७ दिंडी

साइ वचनामृत नित्य मधुर साचें । त्यांत मिश्रण नच असत कटु रसाचें ॥
ज्ञान होत न हें स्वर्गीच्याऽमरांना[9] । कसें होईल तें मर्त्य[10] पामरांना ॥

## बाबांची महती कोण वर्णन करूं शकणार

४८ भुजंगप्रयात

कुठे सूक्ष्मजंतू[11] कुठे तो गरुत्मान्[12] । कुठे वारिजातीं[13] कुठे तो सरित्स्वान्[14] ॥
कुठे दीपिकाती[15] कुठे तो प्रभास्वान्[16] । कुठे भक्षशामा कुठे तो मरुत्वान्[17] ॥

---

श्रीसमर्थ राजयोगी नारायण महाराज. २ एक शिरडीस त्यावेळीं असलेले संत. ३ श्रीसमर्थ सद्गुरु अक्कलकोट स्वामींचे शिष्य. ४ रोवें. ५ भक्त कल्याणार्थ. ६ लाविले. ७ जमीनींत. ८ कै. आण्णासा. दाभोळकरांनीं. ९ देवांना. १० मानवांना. ११ चिलीट. १२ गरुड. १३ डबकें. १४ समुद्र. १५ दिवटी. १६ सूर्य. १७ इंद्र.

२९ वसंततिलका

लीला चमत्कृति अनंत हि संतराया[1]।
केल्या भवाब्धि जड जंतुसि संतराया[2]।
त्या वर्णितां श्रमित गीर्ष्[3] अपूर्ण काला[4]।
श्रीशारदा[5]! मग किती मति बालकाला।

## महाराजांचें अवतार कृत्य

३० कटाव

यापरि शैलधि भूवरि गाजे। मानसि अमरावति ही लाजे। येति दर्शना दुरचे राजे। शास्त्री पंडित गुणगणमंडित। कीर्ति अखंडित भवभय पीडित। तपी योगिजन तर्डी तापडी। पतित बापडी तसेच परकी। विद्याकोविद परकी भाषा-शास्त्र विशारद सभाप्रवचनपटु। व्याख्यन धुरंधर। लेखन-शैली मोहक सुंदर। अधिकारी वा पण्याजीवा[6]। सुख वस्तूजन, अगणित नानाविध पदवीधर। कोणि सेश्वर कोणी निरीश्वर। मानिति कोणी वेद माउली। कोणी न घेती तिची साउली। निर्गुण भक्ती श्रेष्ठ मानिती। सगुण भक्तिची निंदा करिती। नानापरिचे समाज काढिति। नास्तिक बनती पाखंड बोलती। आपुला देश आपुली संस्कृति। आपुले वेद आपुली पद्धति। आपुले पूर्वज आपुली रीती। आपुली भाषा आपुली मती। आपुली स्थिती आपुली स्फिती। आपुले बांधव आपुल्या युवती। आपुले ग्रंथ आपुले संत। आपुले देव आपुले पंथ। आपुले वाङ्मय आपुले ज्ञान। आपुले अर्थ[७] आपुले तीर्थ। यापरि आपुलें जितुकें तितुकें। मानिति लटिकें टवाळि करिती। धर्म बुडविती। परक्या ज्ञानें नेत्र दीपती। साइ सद्गुरु संत भूपती। या सर्वांचें चित्त वेधिती। सगुण भक्तिचें महत्त्व कथिती। अनुभव देउनि तत्व पटविती। सांडुनि अळसा फेडुनि शंका। कर्त-व्याची करित जाग्रती। नास्तिकवृत्ती देशिं धाडिती। नयनीं ज्ञानांजन घालुनिया। अज्ञानाचा नाश करुनिया। अखिल

१ संतराज. २ उत्तम रीतीनें तरुन जाण्यास. ३ वाणी. ४ अपुरा वेळ जिला ती • वाग्स्वामी ६ व्यापारी ७ पुरुषार्थ.

जनांनीं एकी करुनी । एक विचारें नित्य वर्तुनी । स्वहित साधण्या दिशा दाविती । बुद्धि खेंचिती सगुण भक्तिचे । दास बनविती । परमात्मीं दृढ भाव धरुनियां । कार्य कराया प्रवृत्त करिती । यापरि थोर मान्य विभूती । संत नृपाचे दास बनूनी । शैलधिमाजी निवास करिती । दर्शन घेती प्रभुचरणाचें । सार्थक करिती निज जन्माचें । साचें नाचें वाचे वरती । नाम जयाचें नित्य अखंड । घोष प्रचंड प्रेम उदंड । ज्यावरि यापरि सद्भक्तांचें । त्रिभुवन नायक जो । प्रेमें वंदावा ॥

## बाबांचें ऐश्वर्य

५१ कटाव

इंद्रादिक ते सुरगण सारे । संतनृपाची परिसुनि ख्याती । दिव्य विभूती पाहुनि नयनीं । वंदिति घालुनि मान खालती । पदीं लागती हात जोडिती । ध्याती स्तविती पूर्ण ब्रह्म तूं । पुण्यपुरातन नित्य निरंजन । सर्वसाक्षि सर्वज्ञ सनातन । ब्रम्हांडाचा मायबाप तूं । विश्वव्यापक जगपालक तूं । करिशी विश्वचा संहार । अमुचें वैभव सर्व असार । अमरावति ही तुच्छ भिकार । धन्य धन्य हे क्षेत्र शीरडी । मुक्ति रोकडी । धन्य धन्य हे शिरडि निवासी । संतदर्शन नित्य जयासी । धन्य मंदिर धन्य कूप । नीर अमूप, सुधे परिस तें फारचि गोड । केवळ ब्रह्मरसाची जोड । मशीद माइत धुनी नित्य । वैश्वानर तो ब्रह्म सत्य । नंदनवन ते वाटे तुच्छ । प्रधान[1] अथवा लेंडि बाग ही । वाटे केवळ सुरतरु गुच्छ । शाम सुंदर संत तुरंग । ऐरावत जणुं कीटक भृंग । भिक्षा भाकर मधूर सुरस । सुधा तिजपुढें फिकी निरस । निंब वृक्ष तो गुणें आगळा । हरिचंदन त्या पुढें नेभळा । वैराग्याचें तेज आगळें । कंदर्पाचा दर्प मावळे । बघुनी तंव तें रूप सांवळें । ऊर्वशि रंभादीक अप्सरा । लज्जित कंपित मनीं थरथरा । योगेश्वर तूं

१ रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं महाराजाकरितां विकत घेऊन दिलेल्या जमिनींत ही बाग आहे. हिलाच लेंडिबाग म्हणतात.